पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. महिला व बालकल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ९
**सभावृत्तांत**

दिनांक - १०/१२/२०१४ वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१०/१२/२०१४** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा. जाधव साधना रामदास - सभापती**
**२.** मा. जयश्री वसंत गावडे
**३.** मा. काळभोर वैशाली जालिंदर
**४.** मा. आल्हाट मंदा उत्तम
**५.** मा. सौ.स्वाती प्रमोद साने
**६.** मा. बो-हाडे शुभांगी संजय
**७.** मा. भालेकर अरुणा दिलीप
**८.** मा. पवार संगीता शाम

या शिवाय मा.गावडे - सह आयुक्त, मा.कुलकर्णी - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.जगदाळे - सहा.प्रकल्प अधिकारी, मा.बहाद्दरपुरे - सहा.समाजविकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.२) महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिलांना चार चाकी हलके वाहन (L.M.V.) चालविण्याचे (मोटार ड्रायव्हिंग)(TR) प्रशिक्षण देणे ही योजना राबविणेबाबत...

----------

दिनांक २६/११/२०१४ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ८)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : १४ विषय क्रमांक : १

दिनांक : १०/१२/२०१४ विभाग : नागरवस्ती विकास योजना

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.शुभांगी बो-हाडे

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे प्रत्र क्र.नावियो/४/कावि/२५४/२०१४, दि.२८/११/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत मोफत शिवणयंत्र वाटप या योजनेअंतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये सन २००९-१० व २०१०-११ मधील जुनी पोहोच पावती असणा-या अर्जदारांकडून शिवणयंत्र मिळणेकामी जाहीर प्रकटनाद्वारे अर्ज मागविले असता सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरिता ९० इतके अर्ज प्राप्त झाले. प्राप्त अर्जांपैकी ४८ पात्र लाभार्थिंना सन २००९ मधील जुन्या शिवणयंत्राचे वाटप करण्यात आले. तसेच सन २०१०-११ या आर्थिक वर्षाकरिता २४५५ इतके अर्ज प्राप्त झाले आहेत. सन २०१०-११ मधील शिवणयंत्र मिळणेकामी अर्ज केलेल्या ३४५ अपात्र झालेल्या अर्जदारांनी पुन्हा त्रूटी पुर्तता करुन दिली आहे. असे एकूण सन २०१०-११ मधील २८०० एवढे अर्ज विभागात प्राप्त झालेले आहेत. या अर्जांपैकी १४०० अर्जांची छाननी केली असता १२०० अर्ज पात्र ठरले आहेत. म्हणजेच ८० टक्के इतके अर्ज पात्र ठरले असून २० टक्के इतके अर्ज अपात्र ठरले आहेत. म्हणजेच २८०० अर्जांपैकी २२४० अर्ज पात्र ठरतील असा अंदाज आहे. तसेच सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी जाहिर प्रकटनाद्वारे अर्ज मागविले असता १४७३४ अर्ज प्राप्त झाले असून या अर्जाची तपासणी प्रक्रिया चालू असून या अर्जांपैकी १२०० अर्जांची तपासणी केली आहे. त्यामध्ये ९०० अर्ज पात्र ठरले आहेत. म्हणजेच ७५ टक्के अर्ज पात्र होण्याची शक्यता आहे. म्हणजेच १४७३४ अर्जांपैकी अंदाजे एकूण ११०५० अर्ज पात्र होतील असे मत आहे. म्हणजेच दोन्ही आर्थिक वर्षासाठी किमान एकूण १३२९० शिवणयंत्रे खरेदी करावी लागणार असून अंदाजे किमान १३२९० शिवणयंत्रांच्या खरेदीची मागणी करणे उचित वाटते. या शिवणयंत्रांच्या खरेदीकामी गतवर्षीच्या किंमतीमध्ये झालेली वाढ व एल.बी.टी.कर इ. विचारात घेता एकूण मागील खरेदी किंमतीमध्ये अंदाजे २५ टक्के दरवाढ विचारात घेता अंदाजे रक्कम रुपये ६७००/- प्रती नग या दराने शिवणमशीन खरेदी कराव्या लागतील त्यानुसार एकूण र.रु.८,९०,४३,०००/- (अक्षरी र.रु.आठ कोटी नव्वद लाख त्रेचाळीस हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. या योजनेसाठी सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात अंदाजपत्रकामध्ये र.रु.१,२५,००,०००/- एवढी तरतूद वर्ग करण्यात आली होती. त्यामधून शिवणयंत्र खरेदीच्या बिलापोटी र.रु.९५,१०,०००/- एवढे खर्ची पडले आहेत, आणि २९,९०,०००/- एवढी रक्कम शिल्लक आहे. सदर शिवणयंत्र खरेदीचा विचार करता सन २०१४-१५ सुधारित अंदाजपत्रकात ४,६५,९०,०००/- एवढी तरतूद करण्यात येणार आहे. उर्वरित शिवणयंत्रांसाठी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात आवश्यक तरतूद करण्यात येणार असल्याने सदरच्या शिवणयंत्रांची खरेदी करण्यात मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक : १५ विषय क्रमांक : २
दिनांक : १०/१२/२०१४ विभाग : नागरवस्ती विकास योजना
सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.शुभांगी बो-हाडे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे प्रत्र क्र.नाविायो/८/कावि/२५१/२०१४, दि.०८/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिलांना चारचाही हलके वाहन (L.M.V.)चालविण्याचे (मोटार ड्रायव्हिंग) (TR) प्रशिक्षण देणे ही योजना वस्ती पातळीवर प्रति लाभार्थी र.रु.२,२२०/- या दरात, "अ" "ब" व "ई" क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील महिला / मुलींसाठी मे.महालक्ष्मी ऑटोमोटिव्ह प्रा.लि., शिवाजीनगर, पुणे - १६ यांचे मार्फत व "क" "ड" व "फ" क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील महिला / मुलींसाठी मे.साईराज मोटार ड्रायव्हिंग स्कुल, थेरगांव, पुणे ४११ ०३३. यांचेमार्फत पिं.चिं.मनपा हद्दीतील प्रस्तावा सोबतचे महिला लाभार्थ्यांसाठीचे पात्रता निकष (अटी व शर्ती) ची पुर्तता करणा-या महिलांना वस्तीपातळीवर दिनांक ३१/०३/२०१६ अखेरपर्यंतच्या कालावधीत सदरची प्रशिक्षण योजना राबविणेस मान्यता देणेत येत आहे व निविदेनुसार होणा-या र.रु.१,२०,००,०००/- ( अक्षरी र.रु.एक कोटी वीस लाख फक्त ) या रकमेस अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी व आवश्यकतेनुसार सदर योजनेत बदल दुरुस्ती करण्याचा अधिकार मा.आयुक्त सो. यांना देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( जाधव साधना रामदास )
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९९६/२०१४
दिनांक : ११/१२/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत महिलांना चार चाकी हलके वाहन (L.M.V.) चालविण्याचे (मोटार ड्रायव्हिंग) (TR) प्रशिक्षण देणे.

( ठराव क्रमांक १५ दिनांक १०/१२/२०१४ चे लगत )

| ❁ महिला लाभार्थ्यांसाठीचे पात्रता निकष (अटी व शर्ती) | |
|---|---|
| १ | महिला / मुलीच्या नावे आधारकार्ड / आधारकार्ड काढलेबद्दलची पोच पावती (रहिवाशी प्रत) ची साक्षांकित सत्यप्रत आवश्यक. |
| २ | पिं.चिं.म.न.पा.हद्दीत वास्तव्य असणे आवश्यक. |
| ३ | वास्तव्याच्या पुराव्यार्थ महिलांच्या नावे / नाव असलेले:- आधारकार्ड /आधारकार्ड काढलेबद्दलची पोच पावती (रहिवाशी प्रत) / घरपट्टी (मिळकतकर) पावती / पिं.चिं.म.न.पा.चे झोपडपट्टीधारक म्हणुन ओळखपत्र /मतदार ओळखपत्र / विद्युत बिल / टेलिफोन बील/ राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक / रेशनकार्ड. यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत.) पुराव्यार्थ सादर करावे लागेल. |
| ४ | वय वर्ष २० पूर्ण असणे आवश्यक, पुराव्यार्थ जन्मदाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी. प्रमाणपत्र, आधारकार्ड इत्यादी तत्सम् कागदपत्रे यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत.) जोडणे आवश्यक. |
| ५ | ८ वी पास असणे आवश्यक. पुराव्यार्थ शैक्षणिक अर्हता संबधितचा दाखला/प्रमाणपत्र/इ. तत्सम् कागदपत्रे यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत.) जोडणे आवश्यक. |
| ६ | एकुण प्रशिक्षण शुल्काच्या १०% इतकी रक्कम सहभाग शुल्क म्हणुन आगाऊ भरणे आवश्यक. |
| ७ | कौटुंबिक वार्षिक उत्पन्न १,००,०००/- पर्यंत असणे आवश्यक.पुराव्यार्थ मा.तहसिलदार / तत्सम अधिका-याकडील उत्पन्नाचा दाखला. / पिवळे / केशरी रेशनकार्डवरील रक्कम रुपये १,००,०००/- पर्यंतचे नमूद उत्पन्न (साक्षांकित सत्यप्रत.) आवश्यक. |
| ८ | शिकाऊ अनुज्ञप्तीसाठी २ व पक्की अनुज्ञप्तीसाठी २ असे नजिकच्या कालावधीत काढलेले एकुण ४ फोटो (पासपोर्ट साईज) आवश्यक. |
| ९ | याव्यतिरिक्त परिवहन कार्यालयाच्या मागणीनुसार आवश्यक ती कागदपत्रे ( साक्षांकित सत्यप्रत.) सादर करणे बंधनकारक राहील. |
| १० | लग्नानंतरच्या किंवा इतर कारणास्तव नाव बदलाबाबतच्या पुराव्यार्थ पॅनकार्ड / लग्नपत्रीका / विवाह नोंदणी दाखला / प्रमाणपत्र, शासकीय राजपत्र, रक्कम रुपये १००/- च्या स्टँम्प पेपरवर केलेले नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र यापैकी एक कागदपत्र (साक्षांकित सत्यप्रत.) जोडणे आवश्यक. |
| ११ | प्रशिक्षण देण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.अति.आयुक्त.सो.यांना राहील. |

सही/-
आयुक्त.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८.